प्रेसनोट दि.२३/०३/२०१९

## चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन

## रस्ता चुकलेल्या वयोवृद्ध महिलेस नातेवाईकांच्या ताब्यात दिले

दिनांक २२/३/२०१९ रोजी साय १६/०० वा सुमारास औंध पोलिस चौकी येथे एक महीला वय ४० वर्षे रा औंध गाव पुणे यांनी समक्ष चौकीस येवुन पो शि ७५२६ खाडे व पो शि ७७५५ निमसे यांना कळविले की त्यांची वयोवृद्ध सासु वय ८० वर्ष हया रस्ता चुकुन कोठेतरी हरविल्या आहे त्या एक महीन्या पुर्वीच कोकणातुन आलेल्या असुन तीला पुण्यातील रस्ते माहीत नाहीत त्यावर नमुद पोलिस कर्मचारी यांनी मदर महीलेस नमुद वयोवृद्ध महीलेचा फोटो घरी जाऊन वॉट्सऑप करण्यास सांगीतला फोटो वॉट्सऑपवर आल्यावर सदर फोटोवरुन मिसींग महीलेचा शोध घेतला असता त्यांना एक ८० वर्षाची वयोवृद्ध महीला ग्रीनपार्क हॉटेल शेजारी रडत बसलेली दिसली सदर महीलेचा ती रडत असलेला फोटो काढुन पोलिसांनी तीचे सुनेस वॉटसअॅप केला असता सदर महीला ही त्यांची सासु आसल्याचे सांगीतले असता नमुद कर्मचा-यांनी स्वखर्चाने रिक्षाकरुन वयोवृद्ध महीलेस त्यांचे सुनेचे ताब्यात दिले तेव्हा सदर महीलेने व तीचे कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले